**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १०९५/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री.संदिप शंकर सुर्वे**
०३/२, शंकर भवन, सिमला इस्टेटच्या बाजुला,
मोहिली व्हिलेज, परेरा वाडी,साकीनाका,
मुंबई ४०० ०७२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, पोलीस लाईन ओरोस, जि.सिंधुदुर्ग ४१६ ८१२.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कुसूर, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, पोलीस लाईन ओरोस, जि.सिंधुदुर्ग ४१६ ८१२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कुसूर, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.०८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०१.२०२१ | -- | १९.०३.२०२१ | २०.०४.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०५.०७.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती किंवा उत्तर दिलेले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १२.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.घनश्याम शिवराम नावळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुसुर, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" जाक्र.सिजिप/ग्रापापु/आस्था-४/माअ./२१००/२०२१ कुसूर गाव जिल्हा वैभववाडी येथे राबवलेल्या जलस्वराज प्रकल्पाची ही माहिती मला आपल्याकडुन दि.०५.०१.२०२१ रोजी पाठविण्यात आली मात्र मला आवश्यक माहितीचा त्यात समावेश नसल्याने, मी आपणाकडुन माहिती अधिकार कायदाअंतर्गत खालील माहितीची मागणी करत आहे.*

*१) जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत संपूर्ण खर्चाचे अंदाजपत्रकापासुन मुल्यांकनापर्यंत माहिती.*
*२) पुर्ण प्रकल्प कालावधीत गावपातळीवरील मुख्य कमिटी व प्रत्येक वाडीत प्रकल्पाच्या कामावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या (उपसमिती) सदस्यांची नावे व माहिती.*
*३) प्रत्येक वाडीत प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या R.C.C.well व stored tank ज्या जागेवर बांधल्या गेल्या त्या जमिनीचे सातबारा मिळावेत.*
*४) प्रकल्पा अंतर्गत जमा केलेल्या लोकवर्गणीच्या यादीची साक्षांकित प्रत मिळावी.*
*५) प्रकल्पाची मागणी करताना ग्रामसभेकडुन आपल्याकडे सादर केलेल्या ठरावाची प्रत मिळावी.*
*६) गावातील वाडी मध्ये प्रकल्पाअंतर्गत बांधलेल्या R.C.C.well वर बसवलेल्या light meter च्या संदर्भातील सादर केलेली कागदपत्रे.*
*७) एकूण प्रकल्पासाठी लागणाऱ्या साहित्य पुरवठ्याचा तपशील, साहित्य पुरवठा करणाऱ्या कंपनीची माहिती व साहित्य खर्चाचा तपशील. "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी मागणी केलेली माहिती ही उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग व गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत कुसुर, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग या तीन स्तरावरील होती. यापैकी उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी त्यांचे स्तरावरील माहिती दिलेली आहे. तसेच गटविकास अधिकारी यांनी सदरची माहिती उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेशी संबंधित असल्याने, माहिती अर्ज त्यांचेकडे हस्तांतरित केला आहे. तथापि ग्रामपंचायत स्तरावरील माहिती

अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. ग्रामपंचायतीने यासंदर्भात दि.११.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले की, सदर माहिती ग्रामपंचायत दप्तराची पाहणी करता आढळून आली नाही.

सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुसुर, ता.वैभवाडी यांनी असे सांगितले की, सन २०१४ या वर्षापासून ते सदर ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असून, त्यांना कुसुर गावामधील सन २००४ ते २००९ या कालावधीतील जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत झालेल्या विकास कामांचे व त्यावर झालेल्या खर्चाच्या संबंधित दप्तर प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे त्यांना अशी माहिती तक्रारकर्ता यांना देता आली नाही. यासंदर्भात त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार झाली किंवा कसे? किंवा याबाबतचा अहवाल त्यांचे वरिष्ठांकडे पाठविला किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता, त्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिसून आहे.

सन २००४ ते २००९ या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झालेला निधी कुसुर गाव पंचायत समिती वैभववाडी येथे प्राप्त होणे, तो कामावर खर्च होणे. मात्र त्यासंदर्भात कोणतीच कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नाहीत. ही वस्तुस्थिती गंभीर आहे. आणि या बाबींवर विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कुसुर यांनी त्यांना याबाबत माहिती झाल्यानंतर देखिल कोणती कार्यवाही न करणे हे त्यापेक्षाही गंभीर आहे. विद्यमान ग्रामसेवकांचे हे वर्तन यासंदर्भात आपली कोणतीही जबाबदारी नसल्यासारखे आहे. म्हणून या प्रकरणात गटविकास अधिकारी, पंचायत समिती वैभववाडी यांनी चौकशी करुन उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही ग्रामपंचायत कुसुर येथे उपलब्ध नसलेल्या बाबींची गटविकास अधिकारी यांनी स्वत: चौकशी करावी व त्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदरचे कागदपत्रे गहाळ झाली असल्यास, चोरीला गेली असल्यास किंवा हेतुपुरस्सररित्या कार्यालया बाहेर गेली असल्यास गटविकास अधिकारी यांनी याबाबतची रितसर तक्रार संबंधित पोलीस स्टेशनमध्ये दाखल करावी व त्यांनी केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल या खंडपीठाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैभववाडी,
ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

## सुनावणी दिनांक ०७.१०.२०२४ ( In Continuation of order dt.१२.०८.२०२४)

## विवेचन

उपरोक्त दि.१२.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती वैभववाडी यांना आयोगासमोर सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सचिन आप्पासो कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कुसुर, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आयोगाने दि.१२.०८.२०२४ रोजीच्या आदेशाद्वारे तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध नसलेल्या बाबींची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांना पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. तथापि त्यांनी असे कळविले आहे की, सदरचे आदेश त्यांना दि.०३.१०.२०२४ रोजी प्राप्त झाले आहेत. या कालावधीमध्ये त्यांना या प्रकरणी चौकशी करता आली नाही. सबब त्यांनी काही दिवसांच्या कालावधीची मागणी केलेली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणावर पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैभववाडी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करुन स्वत: उपस्थित राहून, आयोगासमोर त्यांचा अहवाल सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वैभववाडी यांनी आयोगाच्या दि.१२.०८.२०२४ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाच्या कार्यालयात स्वत: उपस्थित राहून, पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.११.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैभववाडी,
ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.